**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ अन्वये आदेश.**

जा.क्र./सनिक/अ/प्राधिकृत अधि./श्रीदेव टेवनाई/२०१७
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,कणकवली
यांचे कार्यालय
कणकवली-दिनांक:- २० /०५/२०१७

वाचले:-१.महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८.

१. चेअरमन,श्री देव टेवनाई विविध कार्यकारी सेवा सोसा.लि.तरंदळे,ता.कणकवली,जि.सिंधुदुर्ग यांचेकडील दिनांक २७/०२/२०१७ रोजीचा अहवाल.
२. या कार्यालयाकडील दिनांक ०३/०३/२००१७ रोजीची नोटीस.
३. या कार्यालयाकडील आदेश क्रमांक जा.क्र.सनिक/अ/प्राधिकृत अधि,/श्री देव टेवनाई/२०१७,दि.२५/०३/२०१७
४. मुख्य कार्यकारी अधिकारी,सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.सिंधुदुर्ग यांचेकडील पत्र क्र.जा.क्र.क्षेत्र/वसुली/९९९/३५/०५/२०१६-१७,दि.१०/०४/२०१७.
५. या कार्यालयाकडील पत्र क्रमांक जा.क्र.सनिक/अ/प्राधिकृत अधि/श्रीदेव टेवनाई/२०१७, दिनांक १९/०४/२०१७.
६. मुख्य कार्यकारी अधिकारी,सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.सिंधुदुर्ग यांचेकडील पत्र क्र.जा.क्र.क्षेत्र/वसुली/९९९/३५/६३/२०१७-१८,दि.१२/०५/२०१७.

ज्याअर्थी, श्री देव टेवनाई विविध कार्यकारी सेवा सोसा.लि.तरंदळे, ता.कणकवली,जि.सिंधुदुर्ग ही नोंदणीकृत सहकारी संस्था असून तीचे कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम व संस्था पोटनियम यांना अनुसरुन असणे बंधनकारक आहे. आणि,

ज्याअर्थी,महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ अअअ(५)(अ) मधिल तरतुदीनुसार समिती सदस्य संख्या दोन तृतीयांश इतकी असणे आवश्यक आहे अशी तरतुद आहे, आणि,

ज्याअर्थी,उपरोक्त वाचलेनुसार चेअरमन यांनी संस्थेचे कांही सदस्यांनी राजीनामा दिलेला असल्याने समिती अल्पमतात आल्याबाबतचा अहवाल या कार्यालयास दिनांक २७/०२/२०१७ रोजीने सादर केलेला आहे. सदरील अहवालाचे अवलोकन करता संस्थेची संचालक मंडळ संख्या ०७ संचालक शिल्लक रहातात. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ अअअ(५)(अ) मधिल तरतुदीपेक्षा कमी झालेली असून अल्प मतात आलेले आहे. त्यामुळे उर्वरीत संचालक मंडळास संस्थेचे कोणतेही निर्णय घेण्यास सक्षम नाही. समिती अल्प मतात आलेली असल्याने शिल्लक संचालक मंडळास निष्प्रभावित करण्यांत येऊन संस्थेचे निवडून आलेल्या सदस्यांवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ मधिल तरतुदींनुसार कारवाई करणे क्रमप्राप्त आहे. आणि,

त्याअर्थी, संस्थेचे निवडणुक होवून नवीन समिती पदग्रहण करेतोपर्यंत संस्थेचे कामकाज पाहण्यासाठी प्राधिकृत अधिकारी म्हणून उपरोक्त वाचले क्रमांक ०३ अन्वये श्री.ए.एन्.प्रभु, विकास अधिकारी, सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.शाखा-कणकवली यांची प्राधिकृत अधिकारी (प्रशासक)म्हणून नियुक्ती करण्यांत आलेली होती.

उपरोक्त वाचले पत्र क्रमांक ०४ अन्वये सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक लि.सिंधुदुर्गनगरी यांचेकडून पत्र व्यवहार केले नंतर वाचले क्रमांक ०६ अन्वये प्राधिकृत अधिकारी (प्रशासक) म्हणून नियुक्ती करणेबाबत नांव कळविणेत आलेवरुन या कार्यालयाकडील दिनांक २५/०३/२०१७ आदेशामध्ये अंशत: बदल करणेत येऊन खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यांत येत आहे.

-: आ दे श :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ मधिल तरतुदी अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारा नुसार मी ए. एम. यशवंत. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,कणकवली, श्री देव टेवनाई विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसा.लि.तरंदळे, ता.कणकवली,जि.सिंधुदुर्ग या संस्थेवर श्री.ए.एन्.प्रभु, विकास अधिकारी, सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.शाखा-कणकवली यांची प्राधिकृत अधिकारी (प्रशासक)म्हणून नियुक्ती करणेत आलेली होती ती या आदेशाने रद्द करणेत येऊन सदरील संस्थेवर प्राधिकृत अधिकारी(प्रशासक) म्हणून श्री. एच. सी.अहीरे, विभागीय विकास

अधिकारी, सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.शाखा-कणकवली यांची नियुक्ती करणेत येत आहे. प्राधिकृ अधिकारी यांनी तात्काळ संस्थेचे व्यवस्थापन कामकाज हाती घेऊन सहा महिन्यांचे आंत नवीन समिती कायदेशीररित्या निवडून येण्यासाठी कार्यवाही करावी व कामकाजाचा अहवाल सादर करावा.

हा आदेश माझ्या स्वाक्षरी व कार्यालयीन मुद्रेसह नोंद करुन आज दिनांक २० /०५/२०१७ रोजी निर्गमित केला आहे.

(ए. एम. यशवंत)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, कणकवली

प्रति,

१ माजी चेअरमन/सचिव, श्री देव टेवनाई विविध कार्यकारी सेवा सोसा.लि.तरंदळे, ता.कणकवली,जि.सिंधुदुर्ग

२.श्री.--------------------------सदस्य, मु.पो.तरंदळे, ता.कणकवली,जि.सिंधुदुर्ग

३. श्री. एच. सी.अहीरे, विभागीय विकास अधिकारी, सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.शाखा-कणकवली

आपणांस सुचित करण्यांत येत आहे की, सदर आदेशाची नोंद घेऊन चार्ज देणे-घेणे याबाबत कार्यवाही करावी व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

४. श्री.ए.एन्.प्रभु, विकास अधिकारी,सिंधुदुर्ग जिल्हा मध्य. सहकारी बँक लि.शाखा-कणकवली यांना माहितीसाठी रवाना.

प्रत:-

१.मा.सचिव, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण , महाराष्ट्र राज्य पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.

२.मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,सिंधुदुर्ग. यांना माहितीसाठी सविनय सादर.

३.मा.जिल्हा विशेष लेखापरीक्षक(वर्ग-१), सहकारी संस्था,सिंधुदुर्ग, यांना माहितीसाठी सविनय सादर.

४.सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. शाखा-कणकवली यांना माहितीसाठी व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

५.मुख्य कार्यकारी अधिकारी,सिंधुदुर्ग जिल्हा मध्य.सहकारी बँक लि.सिंधुदुर्ग,मु.पो.सिंधुदुर्गनगरी,ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग यांना त्यांचेकडील दिनांक १२/०५/२०१७ रोजीचे पत्र अनुसरुन माहितीसाठी व संबंधित कर्मचारी यांना सुचना निर्गमित करणेसाठी सादर.

सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, कणकवली